महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२३/प्र.क्र.२१७/एसएम-२ दिनांक:- ३१ जुलै, २०२३

## मान्यता पत्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
नारायणा एज्युकेशनल ट्रस्ट,
बोरीवली (प.), मुंबई.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**नारायणा एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित नारायणा ई-टेक्नो स्कूल, सर्व्हे नं. २१२/अ, वाडी (बु) नांदेड, ता.जि. नांदेड.**

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.२१७/एसएम-२, दि. २१.०४.२०२३.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **नारायणा एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून **नारायणा ई-टेक्नो स्कूल, सर्व्हे नं. २१२/अ, वाडी (बु) नांदेड, ता.जि. नांदेड या शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई, सर्व शाखा)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून **नारायणा एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई** संचलित **नारायणा ई-टेक्नो स्कूल, सर्व्हे नं. २१२/अ, वाडी (बु) नांदेड, ता.जि. नांदेड या शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई, सर्व शाखा)** या स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे.

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.
७. निवडनस्ती एसएम-२/ (प्र.क्र.२१७/२०२३).

Maharashtra Government
Department of School Education & Entomology,
Ministry (Extension), Hall no. 432.
Madam Kama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai-32
Email ID : sm2.sesd-mh@gov.in

Serial Number : SFS-1023/P.No.217/SM-2 Date : 31 July 2023

**Recognition Letter**

**To,**
**Chairman / Secretary,**
Narayana Educational Trust,
I.C. Colony, Borivali (W),
Mumbai-400 103

**Subject -** Letter of approval for starting new schools or upgrading existing schools on self-financing basis under the Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act. 2012...

Narayana Educational Trust, Borivali (W), Mumbai Operated Narayana E-Techno school Survey No. 212/A, Wadi (Bk), Nanded, Tq & Dist. Nanded

Reference - Letter of Intent No. SFS-1023/P.No.217/SM-2. Date : 21.04.2023

Narayana E-Techno School operated by Narayan Educational Trust, Borivali (W), Mumbai under the Maharashrta Self-Funding Schools (Establishment and Regulation) Act, 2012, Survey No. 212/A , Wadi (Bk), Nanded, Tq. & Dist. Nanded applied for starting a new school (Primary to Higher Secondary, etc. 1st to 12th, English Medium, CBSE) on self-financed basis.

2. In respect of your application, under the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Rules, 2020 from the academic year 2023-2024, Narayana Eductional Trust, Borivali(W), Mumbai operated by Narayana E-Teachno School, Survey No. 212/A, Wadi (Bk), Nanded, Tq & Dist. Nanded to start construction of school (Primary to Higher Secondary, etc. 1st to 12th, English medium, CBSE) on self-financed basis, subject to terms and conditions A letter of intent was given. Now, approval to start the said new school from the academic year 2023-24 is granted subject to the following terms and conditions -

3. **Terms and Conditions :**

1) The proposed school meets all the standards prescribed by the Right of Child to Free and Compulsory Eduction Act. 2009 and the Maharashtra Right of Child to Free and Compulsory Eduction Rules, 2011. The terms and conditions and the directions issued by the Government under this Act shall comply with the standards or terms and conditions specified by the Government from time to time.

2) It is mandatory for registered institutions, trusts and companies to comply with all standards, terms and conditions prescribed by the Maharashtra Self-Funding Schools (Establishment and Regulation Act, 2012) and the directions issued by the Government under this Act of the standards specified by the Government from time to time.

3) CBSE or CISCE or C.A.I.E. or I.B. etc. it is mandatory for the school managements who are interested in the affiliation of the board, to obtain a no objection certificate from teh government as per the instructions issued by the government from time to time.

4) The school management shall inform the concerned district education anthority before the commencement of the academic year as approved by the Government.

5) Permission granted under the provisions of this Act ot establish a new school or upgrade a school shall be for the academic year for which it is granted.

6) If the school management, within 18 months, fails to start the school, the approval letter issued shall lapse.

7) The school management cannot change the medium of education employed, the location of the school, in future, without the permission of the Government.

8) If the school management has established a school at a place other than the place sanctioned by the Government, the permission of that school shall be cancelled.

9) It has been provided that the recruitment of teachers and non-teaching staff in self-financed schools should be done in accordance with the prevailing rules and regulations of the Government.

10) While entering district wise information, the school to which permission has been granted, as a separate category "Aided Schools" will be filled in and U.D.I.S.E. will get the number. In fact, State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai, announded as Nodal Officer has been done.

11) The school management shall put up a board at the entrance of the school premises saying "Self-Supporting Permitted School.

12) By reason of failure to comply with any of the provisions of this Act or the rules made thereunder or any direction issued under the Act or any standard or certification or terms and conditions specified by the Government from time to time, at any time. The State Government may revoke the approval letter issued.

(Pradeep Padole)
Section Officer, Government of Maharashtra

For copy information -

1. Commissioner, Education, Maharashtra State, Pune.
2. State Project Director, Maharashtra Council of Primary Education, Mumbai.
3. Director, (Secondary & Higher Secondary), Maharashtra State, Pune
4. Director, (Primary), Maharashtra State, Pune.
5. Deputy Director of Departmental Teaching, Latur Department, Latur
6. Education Officer (Primary/Secondary), Zilla Parishad, Nanded.
7. ...ction No. SM-2/(No 217/2023)

NOTARIAL REGISTER
SR.NO. 257 DATE 28/06/24

28 JUN 2024

AFFIDAVIT

Shashikala w/o Chotoji ... Age, Wadali Bk ... Yrs. Occu. Service
R/o. A/P ... HO ... Tq. Nanded Dist Nanded ... do Swear in the Name of God

MADHAV C. TIDKE
Advocate & Notary
(Appointed by Govt. of India)
Nanded, Dist. Nanded. (M.S.)

Identified by ... Self
28/06/24